N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** ठाणे नगर **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0282 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/10/2019 16:21 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** **Date From (दिनांक पासून):**

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):**

**Time From (वेळेपासून):**

**Time To (वेळेपर्यंत):**

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 10/10/2019 **Time (वेळ):** 15:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 038 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/10/2019 16:21 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 0.1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कार्यकारी अभियंता ,बांधकाम विभाग,जिल्हापरिषद ठाणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** किरण अमृतराव पोटे

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** अमृतराव पोटे

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1975 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पारापोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हौसिंग सोसायटी,जी-08, शिवस्मती नंबर 3,रहेजा कॉम्पलेक्स जवळ,बाळकुम,कापूरबावडी, ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | हौसिंग सोसायटी,जी-08, शिवस्मती नंबर 3,रहेजा कॉम्पलेक्स जवळ,बाळकुम,कापूरबावडी, ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** ठेकेदार

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9867733661

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अरूण भाईदास चव्हाण | | वडील का नाम : भाईदास चव्हाण | 1. बांधकाम विभाग,जिल्हा परिषद ठाणे, ठाणे नगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सचिन बाळाराम चाळके | | वडील का नाम : बाळाराम चाळके | 1. बांधकाम विभाग, ,जिल्हा परिषद ठाणे, ठाणे नगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

नमुद वेळी सपोनि पाटील निवेदन करतात की, पो.नि. /लक्ष्मण राठोड ACB ठाणे यांनी समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहुन लेखी रिपोर्टसह तक्रार यांची तक्रार दिल्याने मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना माहीती देवून खालीलप्रमाणे गुन्हा दाखल करीत आहोत.फिर्यादी - फिर्यादी नामे किरण अमृतराव पोटे, वय 44 वर्षे, व्यवसाय-ठेकेदार, राहणार:- जी-08, शिवस्मृती नंबर 3,हौसिंग सोसायटी,रहेजा कॉम्पलेक्स जवळ, बाळकुम,ठाणे पश्चिम मोबाईल नंबर 9867733661आरोपी नामे-1) श्री.अरूण भाईदास चव्हाण, वय- 56 वर्षे ,तत्कालीन कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे 2) श्री.सचिन बाळाराम चाळके,वय-42 वर्षे , बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणेअ.घ.ता.वेळ व ठिकाण - दिनांक 30/07/2019 रोजी हकीकत तरी मी दिनांक 26/07/2019 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 30/07/2019 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईत,माझे जिल्हा परिषद ठाणे, बांधकाम विभागातील मुख्य इमारतीतील मुख्य लेखा वित्त अधिकारी व वि.अ.यांचे केबीनचे नुतणीकरणाचे केलेल्या कामाचे बिल मंजुर करून देणेकरीता लोकसेवक श्री.अरूण भाईदास चव्हाण, तत्कालीन कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे व श्री.सचिन बाळाराम चाळके, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांनी माझे कडे तडजोडी अंती 8,000/- रूपये लाचेची मागणी केली. म्हणून माझी त्यांचे विरोधात कायदेशीर फिर्याद असुन लोकसेवक श्री.अरूण भाईदास चव्हाण, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे व श्री.सचिन चाळके, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांचेविरूध्द कारवाई होणेस विनंती आहे. अशी फिर्याद दिल्याने ती गुन्हा रजिस्टर दाखल करून सदर गुन्ह्याची माहीती ईमेल द्वारे ठाणे नियत्रंण कक्ष येथे पाठविली आहे तसेच खबरी रिपोर्टची एक प्रत ताबडतोब फिर्यादिस विनामुल्य अदा केली आहे. तसेच एक प्रत मा. न्यायालयात पाठविण्याची तजवीज ठेवली आहे.तसेच सदर गुन्ह्याची माहीती मा. वरिष्ठांना देण्यात आली.मा.वपोनि सो यांचे आदेशान्वये गुन्ह्याचा पुढील तपास पोनि/राठोड हे करीत आहेत.
ठाणेनगर पोलीस स्टेशन गु.र.नं. 282/2019

मी किरण अमृतराव पोटे, वय 44 वर्षे, व्यवसाय-ठेकेदार, राहणार:- जी-08, शिवस्मृती नंबर 3,हौसिंग सोसायटी,रहेजा कॉम्पलेक्स जवळ, बाळकुम,ठाणे पश्चिम मोबाईल नंबर 9867733661

मी वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्यावर सुमारे 10 वर्षापासुन माझे परिवारासह राहणेस आहे व मी ठेकेदारीचा व्यवसाय करतो.माझे कडे



Scanned by CamScanner

साहेबांच्या केबीनमध्ये घेवुन गेलो. त्यावेळी मी चव्हाण साहेबांना थोडं बोलायचं होतं असे सांगुन दहा टक्के मला जास्त होतात असे सांगितले असता चव्हाण साहेबांनी मला मी बोललो होतो आता तुम्ही तुमचं सांगा असे बोलले असता मी त्यांना आठ हजार असे सांगताच चव्हाण साहेबांनी ठिक आहे असे म्हणाले. त्यावर मी त्यांना आठ हजार ना, आता होईल की उदया सकाळी असे विचारले असता त्यांनी मला किती बिले आहेत? असे विचारले असता मी त्यांना माझी दोन बिले असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी मला एक लाखाची आहेत काय ? असे विचारले त्यावर मी त्यांना नाही दोन पन्नासची आहेत असे सांगताच त्यांना पन्नास पन्नासची आहेत काय असे म्हणुन ठिक आहे करून टाक असे सांगताच मी त्यांना आता घेवुन येवु ? करताय सहया असे विचारले असता त्यांनी हो म्हटले. त्यानंतर मी व चाळके असे चव्हाण साहेबांच्या केबीनमधुन बाहेर आलो व मी चाळके यांना बील घेवुन येण्यास सांगितले त्यानंतर लगेचच चव्हाण साहेबांनी मला व चाळके असे आम्हाला पुन्हा आतमध्ये बोलावुन, चाळके यांचेकडे इशारा करून याचंही काय करून टाक असे सांगितले त्यावर मी त्यांना देतो ना असे सांगितले व आम्ही दोघे केबीनमधुन बाहेर आलो व मी चाळके यांना एम.बी.घेवुन या असे सांगुन मी पाच मिनिटात येतो असे बोलुन कार्यालयातुन बाहेर पडलो.त्यानंतर मी, व पंच श्री. दशपुते असे तेथुन निघुन पडताळणी पथकाजवळ आलो.

वरील प्रमाणे झालेल्या संभाषणावरून, लोकसेवक्र श्री.चव्हाण यांना संशय येवु नये म्हणुन पोनिरी.राठोड यांनी सदर कारवाई मध्ये पडताळणी, सापळापूर्व व सापळा पंचनामा एकत्रीत करण्याचा निर्णय घेतला.त्याप्रमाणे अँन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय, ठाणे येथे सापळा पुर्व पंचनामा कारवाई पुर्ण झाल्यानंतर मी सापळा केस कामी हजर केलेले 8,000/- रूपये माझे शर्टचे डावे खिशात ठेवुन दिले.त्यानंतर पोनिरी.राठोड यांनी यापुढील सापळा कारवाई कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे येथे करण्याचा निर्णय घेतला व सापळा कारवाईचे अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर माझे शर्टचे आतमध्ये डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व छुपा कॅमेरा लावल्यानंतर मी व पंच श्री. दशपुते असे आम्ही लोकसेवक श्री.चव्हाण, कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांची भेट घेण्याकरीता कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे येथील त्यांचे कार्यालयात गेलो. त्यावेळी मी, त्या ठिकाणी हजर असलेल्या कार्यालयीन कर्मचाऱ्यास चव्हाण साहेब आहेत काय? असे विचारले असता त्याने साहेब एका माणसाचे कामासाठी गेले असल्याचे सांगितले. त्यावर मी त्यांना किती वेळ लागेल असे विचारले असता, त्या कर्मचाऱ्याने काय माहिती आता उपाध्यक्षांनी बोलवलंय कुठल्या तरी विषयावर चर्चा आहे असे सांगुन येतील असे सांगितले. त्यावर मी त्या कर्मचाऱ्यास किती वेळ झाला आहे जावुन ? असे विचारले असता त्या कर्मचाऱ्याने आर्धा एक तास झाला असेल असे सांगितले. त्यानंतर थोडया वेळाने चव्हाण साहेब आले व केबीनचे बाहेरच थांबुन त्यांनी मला विचारले की, झालं ना ? त्यावर मी त्यांना नाही, मला वाटले की आता करताय की काय असे बोलुन करताय सर सहया? असे विचारले असता चव्हाण साहेबांनी मला, आता एक मॅडमच्या सहया बाकी आहेत. ओपनिंगवरती पाकीट ओपन केले नाहीत त्यांनी असे सांगुन त्या मॅडम आहेत काय? असे विचारले असता मी त्यांना मॅडम नाहीत उदया येतील असे सांगितले असता चव्हाण साहेबांनी मला सहया पाच मिनिटात होतील टेंडरच पास नाही आहे.त्यांच्या सहया ओपनिंगवरीत पाकीट ओपन झाल्यावरीत मग मी तुमचं करेल असे सांगितले. त्यावर मी त्यांना उदया आहेत मॅडम असे सांगितले असता चव्हाण साहेबांनी मला उदया मॅडमच्या सहया घ्या मग पुटअप करू फाईल असे सांगुन ठिक आहे त्यांच्या सहया होवु दया पास करून घेवु असे सांगुन मला उदया येण्यास सांगितले. त्यानंतर मी, व पंच श्री.दशपुते असे तेथुन निघुन सापळा पथकाजवळ आलो.

दिनांक 30/07/2019 रोजी करण्यात आलेल्या सापळा परत कारवाईत लोकसेवक श्री. चव्हाण यांनी दिनांक 31/07/2019 रोजी लाचेची रक्कम घेवुन बोलविल्याचे निष्पन्न झाल्याने,लोकसेवक श्री. अरूण चव्हाण, कार्यकारी अभियंता यांचेकडे दिनांक 31/07/2019 रोजी त्यांचे कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे येथील कार्यालयात सापळा कारवाई आजमाविण्याचा निर्णय पोनिरी. राठोड यांनी घेतला. त्याप्रमाणे दिनांक 31/07/2019 रोजी पुन्हा अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, ठाणे येथे सापळा पुर्व पंचनामा कारवाई पुर्ण झाल्यानंतर सापळा केस कामी हजर केलेले 8,000/- रूपये माझे शर्टचे डावे खिशात ठेवुन दिले व दिनांक 30/07/2019 रोजी दिलेल्या सुचनांची उजळणी घेतली. त्यानंतर माझे शर्टचे आतमध्ये डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व छुपा कॅमेरा लावल्यानंतर मी व पंच श्री. दशपुते असे आम्ही लोकसेवक श्री.चव्हाण, कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांची भेट घेण्याकरीता कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे येथील त्यांचे कार्यालयात गेलो. त्यावेळी मी, चव्हाण साहेबांना आत येवु का? असे विचारून त्यांचे केबीनमध्ये शिरलो. त्यावेळी श्री.चव्हाण साहेबांनी, चाळके नाही आले काय असे विचारले असता मी त्यांना साहेब घ्याना करून पाहुणे आलेत मला जायचे होते. असे सांगितले असता चव्हाण साहेबांनी, बघतो चाळक्यांशी बोलतो, चाळक्यांना बोलावलय असे मला सांगितले. त्यावर मी त्यांना मग मी थांबु का असे विचारले असता त्यांनी थांबण्यास सांगितले. त्यानंतर मी त्यांचे केबनीचे बाहेर येवुन थांबुन राहिलो. त्यानंतर मी तेथील कर्मचाऱ्यास चाळके साहेब कुठे आहेत असे विचारले असता त्या कर्मचाऱ्यांनी मला हो आहेत असे सांगुन ते जेवण करून राऊंडला गेले असल्याचे सांगितले. त्यानंतर थोडया वेळाने मी चव्हाण साहेबांच्या केबीनमध्ये आत डोकावल असता चव्हाण साहेब जेवण करीत असल्याचे दिसले त्यावेळी मी त्यांना जेवण झाल्यावर सांगा आम्ही बाहेर बसतो असे सांगुन चाळके यांचे येण्याची वाट पाहत होतो. त्यानंतर थोडयावेळाने चाळके त्या ठिकाणी आले. त्यावेळी चाळके साहेबांनी मला चव्हाण साहेब काय बोलले असे विचारले असता, मी त्यांना तुमच्याशी बोलते म्हणाले. त्यावर चाळके यांनी मला कशाला बोलायचं काय झंझट आहे म्हणुन मला राग येतो, अशी कामं सांगायची नाय परत मला असे म्हणु लागले. त्यावर मी चाळके सांगाना तुम्हीच त्यांना असे सांगितल्यावर चाळके मला सांगु लागले की, काल बोलले ना तुम्हाला आठ हजार घेवुन या. मग मला कशाला बोलायचं आता परत, मला आता फोन केला होता. असे बोलुन नाही जमणार मला म्हणुन मी राव साहेबांना सांगितलं होतं व तुम्ही ही एम.बी.घेवुन आत जा व तुमच्या माणसाला सांगा. आणि पोटयांना बोलावुन घ्या लवकर आहेत त्या मुडमध्ये घ्या सही करून असे चाळके यांनी मला सांगितल्यावर मी चाळकें यांना बोललो की कामचं एकदा बोलुन टाका असं किती दिवस लटकायचं ? असे बोललो असता चाळके म्हणाले कुणावर भरोसा नाय,चोर आहेत,एकाच वेळेला मी तिघांच सांगितलं,तुम्ही माझ्याशी वाईट तर वाईट मग तुम्ही मी सांगतो ते करायला पाहिजे ना.मग कशाला मध्ये फुकट आपण असे बोलल्यानंतर मी त्यांना ते सारखे तुमचंच नाव घेतात असे बोलल्यावर चाळके म्हणाले मी राव साहेबांना कशाला सांगितलं. इतके दिवस झाले मी दहा दिवस शांत बसलो का तर तुम्ही काही तरी दयाल घ्याल.असे बोलल्यानंतर मी त्यांना,जवळ जवळ दहा वीस दिवस झालेत असे बोलले असता,चाळके यांनी माझे कडे येवुन दहा दिवस झालेत असे बोलुन,त्यांनी मला तुमच्या लेवलला मिळवुन घ्या.मला याच्यात पाडु नका कारण मला एवढा वेळ नाही आता झंझट करायला कामं करायला वेळ नाही.असे बोलल्यानंतर मी चाळकेंना तुमचं बोलणं झालं सगळं झालं, त्यांनी बोलावुन सांगितलं असं बोललो असता,चाळके मला बोलले की मला चव्हाण साहेबांनी काम बरोबर केले की नाही ते सगळयांची तपासण्यास सांगितले.त्यावर मी त्यांना म्हणालो आता सगळयांची तपासुन बिले पण निघालीत मग माझं का नाही बील निघत असे बोलुन एक बील राहिल्याचे सांगितले असता त्यांनी मला एक नाही दोन बीले राहिली असल्याचे सांगितले. त्यावर मी चाळके यांना एकदा चव्हाण साहेबांना भेटुन काम पण बघण्यास सांगितले असता चाळके म्हणाले की, मी जर गेलो तर परत माझ्यावर पेंडींग राहील एम बी मागत होते माझ्याकडे रावसाहेब,समोरच्याने विश्वासाने दिला मला विश्वास तोडता येत नाय आणि दुसरी गोष्ट सही तुम्ही त्यांचीय घेणार की नाय असे बोलुन मी बिल परत खाली पाठवुन दिली व पवारला बोललो हे तुमच्याकडे ठेवा मला या झंझटमध्ये पाडु नका. असे चाळकेनी मला सांगितल्यानंतर मी चाळकेंना आज महिना झालाय, ते बोलले ना आठ हजार घेवुन ये असे बोललो असता, चाळके म्हणाले की माझे यामध्ये काय आहे हयाच्याकडे बोला काय



Scanned by CamScanner

ते झंझट मिटवुन टाका. त्यावर मी चाळके यांना सांगितले की एकदा तुम्ही सांगा घेवु नका काय असेल ते असं बोलुन मग तुमचं नाव कशाला घेतो असे चाळके यांना बोललो असता चाळके मला बोलले की, एमबी माझ्याकडे दिली होती. त्यावर मी त्यांना मी काय करू आता, असे बोलुन आत जातो जर ते ओरडले तर त्यांना बोलतो काय ते तुम्हीच सांगा आणि विषय संपवुन टाका असे बोलुन टाकतो असे चाळके यांना बोललो असता चाळकेनी मला डायरेक्ट जावुन बोलण्यास सांगितले. त्यांनतर मी थोडया वेळाने चव्हाण साहेबांच्या केबीनमध्ये गेलो त्यावेळी मी त्यांना चाळके देतो म्हणतात तुम्ही बोला त्यांच्याशी असे बोलुन चाळके इथे होते आता बोलवु का ? असे विचारून आता खुप दिवस झालेत ते करतील ना त्या बाईचं असे बोललो असता चव्हाण साहेबांनी मला बाकी काम झालं ना असे विचारले असता मी त्यांना हो ते सर्व तयार केलं होतं सहया केल्यात ना त्याच्यावर असे बोललो असता चव्हाण साहेबांनी काही ठिकाणी सहया राहिल्या असल्याचे सांगितले त्यावेळी मी त्यांना एखाद दुसरी चुकुन राहिली असेल बाकीच्या सहया झालेल्या आहेत असे सांगितले असता, बाकीचे अपडेट केले काय याबाबत चव्हाण साहेबांनी विचारले त्यावर मी त्यांना हो बाकी सगळं अपडेट केले असल्याचे सांगितले. त्यानंतर चव्हाण साहेबांनी मला दुसरं काय काम आहेत ? याबाबत विचारले असता मी त्यांना दुसरी तर आहेत कामं असे सांगितले असता त्यांनी बिल राहीलंय काय असे विचारले असता मी त्यांना बिल नाही असे बोलुन अक्षरशः मी कंटाळलोय ते घेवुन त्यांची सही चाळके राव साहेबांनाच सांगा ना तेच घेतील आणि सहया कुठे राहिलेल्या ते त्यांनी बघितलय ना चेक केलय. त्यांना तुम्हीच सांगितलं होतं ना सर्व चेक करायला. असे बोललो असता ठिक आहे मी बोलतो त्यांच्याशी असे बोलले. त्यानंतर मी, व पंच श्री. दशपुते असे तेथुन निघुन सापळा पथकाजवळ परत आलो. त्यावेळी पोनिरी.राठोड यांनी वरील प्रमाणे झालेल्या संभाषणात लोकसेवक श्री.अरूण चव्हाण, कार्यकारी अभियंता यांनी पडताळणी कारवाईचे वेळी मागणी केलली लाचेची रक्कम आज रोजी स्विकारली नसल्याने,तसेच माझे देयकावर कार्यालयीन लिपीकाच्या सहया झाल्या नसल्याने त्या सहया झाल्यानंतर सदरच्या देयकावर लोकसेवक श्री.अरूण चव्हाण, कार्यकारी अभियंता हे सही करणार असल्याचे निष्पन्न झाले असल्याचे सांगितले व त्याचवेळी मी माझे मुलीचे शालेय अँडमिशनचे कामानिमीत्त बाहेरगावी जाणे आवश्यक असल्याचे सांगुन, माझे देयकावर संबंधीत लिपीकांच्या सहया झाल्यानंतर यापुढील लाचेची सापळा कारवाई करण्याची मी विनंती केली.

त्यानंतर मी दिनांक 19/08/2019 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात उपस्थित राहुन पोनिरी.राठोड यांना, दिनांक 31/07/2019 रोजी करण्यात आलेल्या सापळा परत कारवाईस बराच कालावधी झालेला असुन, लोकसेवक श्री.चव्हाण यांचेकडे पुढील सापळा कारवाई आज रोजी आयोजित करावी अशी विनंती केली. त्याप्रमाणे दिनांक 19/08/2019 रोजी पुन्हा लोकसेवक श्री. अरूण चव्हाण, कार्यकारी अभियंता, यांचेकडे त्यांचे कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे येथील कार्यालयात सापळा आजमाविण्याचा निर्णय पोनिरी.राठोड यांनी घेतला. त्याअनुषंगाने पुन्हा सापळा पुर्व पंचनामा कारवाई पुर्ण झाल्यानंतर सापळा केस कामी हजर केलेले 8,000/- रूपये माझे शर्टचे डावे खिशात ठेवुन दिले व दिनांक 31/07/2019 रोजी दिलेल्या सुचनांची उजळणी घेतली. त्यानंतर माझे शर्टचे आतमध्ये डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व छुपा कॅमेरा लावल्यानंतर मी व पंच श्री. दशपुते असे आम्ही लोकसेवक श्री.चव्हाण, कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांची भेट घेण्याकरीता कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे येथील त्यांचे कार्यालयात गेलो. त्यावेळी मी तेथील कर्मचाऱ्यास चव्हाण साहेब आत आहेत का असे विचारून आतमध्ये कोण आहे याबाबत विचारले व थोडा वेळ थांबुन मी चव्हाण साहेबांचे केबीनचा दरवाजा उघडुन चव्हाण साहेबांना आत येवु का असे विचारून आत केबीनमध्ये शिरलो. त्यावेळी पंच श्री.दशपुते हे केबीनचे बाहेरच थांबुन राहिले. मी केबीनमध्ये आत गेल्यानंतर चव्हाण साहेबांना बीला संदर्भात भेटायचे होते असे सांगितले असता त्यावर चव्हाण साहेबांनी मला पानसरेंना भेटुन त्यांना बीलाबद्दल सांगा असे सांगुन पानसरेंना भेटण्यास सांगितले. त्यावर मी त्यांना साहेब माझी अडचण झाली आहे बिल निघायला पाहिजे होते असे सांगितल्यावर त्यांनी पुन्हा मला तुम्ही पनसरेंना भेटा असे सांगितले. त्यावर मी त्यांना त्यांच्याकडे आहे का आता असे विचारले असता चव्हाण साहेबांनी मला त्यांचे कडे सर्व चार्ज हॅन्ड ओव्हर करून टाकला आहे. तुम्ही पानसरेंना जावुन भेटा असे सांगितले. त्यावर मी त्यांना तुमचे बोलणे झाले का त्यांच्याशी असे चव्हाण साहेबांना विचारले असता, चव्हाण साहेबांनी मला पानसरेंना भेटण्यास सांगितले. त्यावर मी त्यांना ओके म्हणुन मी, व पंच श्री.दशपुते असे लोकसेवक श्री. चव्हाण यांचे कार्यालयातुन बाहेर निघुन सापळा पथकाजवळ परत आलो व झालेले सर्व संभाषण मी पोनिरी.राठोड यांना सांगितले. त्यानंतर पोनिरी.राठोड यांनी लोकसेवक श्री.अरूण चव्हाण, कार्यकारी अभियंता यांनी श्री.पानसरे यांना भेटण्यास सांगितल्याने मला पुन्हा लोकसेवक श्री. चव्हाण यांचे कार्यालयातील कर्मचारी श्री.पानसरे यांची भेट घेण्यास पाठविण्याचा निर्णय घेतला व पुन्हा माझे शर्टचे आतमध्ये डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व छुपा कॅमेरा लावल्यानंतर मी व पंच श्री. दशपुते असे आम्ही लोकसेवक श्री.चव्हाण, कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांचे कार्यालयातील कर्मचारी श्री.पानसरे यांना ते बसतात त्या ठिकाणी भेटण्यास गेलो असता ते दिसुन न आल्याने मी तेथील शिपायास पानसरे साहेब आहेत काय ? असे विचारून साहेबांना दोन मिनिटांकरीता भेटायचे आहे असे सांगितले असता त्या शिपायाने मला साहेब नसल्याचे सांगितले. त्यावर मी त्यांना मग मी थांबतो असे सांगुन तेथेच थांबुन असतांना लगेचच श्री. पानसरे साहेब आले व मी त्यांना साहेबांनी तुम्हाला भेटायला सांगितले असल्याचे सांगितले असता श्री. पानसरे म्हणाले की मला काय ? असे प्रश्नार्थक विचारल्यावर मी त्यांना म्हणालो की बीला संदर्भात आहे. बिल चाळकेंनी फेर तपासणी करून दिलंय, बोलणं पण झालंय आता साहेब तुम्हाला भेटायला सांगतात असे श्री.पानसरे यांना सांगितले असता, श्री.पानसरे मला म्हणाले मी साहेबांना विचारून घेतो पाहिजे तर, त्यांनी मला का भेटायला सांगितलंय असे बोलले असता मी त्यांना साहेबांचे तुमच्याशी बोलणं झाल नाही ? असे विचारले असता श्री.पानसरे यांनी नाही बोलुन मला त्यांनी बिल सापडलंय का ? असे विचारले असता मी श्री.पानसरेंना सांगितले की, चव्हाण साहेब बिला संदर्भात सांगायला तयार नाहीत, त्यांना मी सांगितलं की मला पैशांचा प्रॉब्लेम आहे तर त्यांनी मला तुम्हाला भेटण्यास सांगितले. त्यावर श्री. पानसरे बोलले की, मी बोलुन घेतो आणि फोनवरून सांगतो असे सांगुन श्री.पानसरे निघुन गेले. त्यानंतर मी, व पंच श्री. दशपुते असे कार्यालयातुन बाहेर निघुन, सापळा पथकाजवळ परत आलो.

दिनांक 19/08/2019 रोजी केलेल्या सापळा परत पंचनामा कारवाईनंतर मला कधीच लोकसेवक श्री.चव्हाण, श्री.चाळके अथवा श्री.पानसरे यांचा फोन आला नाही.

त्यानंतर माझे देयकाबाबत पुढे काय झाले याबाबत विचारणा करण्यासाठी मी दिनांक 11/09/2019 रोजी कार्यकारी अभियंता श्री.अरूण भाईदास चव्हाण,बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांना भेटण्यास त्यांचे कार्यालयात गेलो असता, त्यावेळी मला समजले की, कार्यकारी अभियंता श्री.अरूण भाईदास चव्हाण,बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांची दिनांक 07/09/2019 रोजी सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, कोकण येथे झाली असल्याचे व त्यांना दिनांक 09/09/2019 रोजी बदली ठिकाणी कार्यमुक्त केल्याचे समजले. त्यानंतर त्याच दिवशी मी माझे बीला संदर्भात तेथील संबंधीत कर्मचाऱ्याकडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, लोकसेवक श्री.चव्हाण, कार्यकारी अभियंता यांनी बदली ठिकाणी जाण्यापुर्वी बिलावर सहया केल्या असल्याचे सांगुन, माझे बिल मंजुरी साठी फायनान्स डिपार्टमेंटमध्ये पाठविले असल्याचे सांगितले.

त्यानंतर माझे प्रगती इमारतीमध्ये मु.ले.अ.व वि.अ. यांचे केबीनचे नुतनीकरण केल्याचे प्रलंबित बिल दिनांक 18/09/2019 रोजी ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँक, झेड पी विस्तारित कक्ष शाखा, ठाणे या बँकेतील माझे चालू खाते क्रमांक 40 या खात्यावर रू.45,909/- जमा झालेले



Scanned by CamScanner

आहेत.

एकंदरीत लोकसेवक श्री.अरूण भाईदास चव्हाण, तत्कालीन कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांची दिनांक 07/09/2019 रोजी सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, कोकण, नवी मुंबई येथे बदली झाली असुन, त्यांना दिनांक 09/09/2019 रोजी बदली ठिकाणी कार्यमुक्त करण्यात आलेले आहे. तसेच माझे प्रलंबित कामाचे बिल दिनांक 18/09/2019 रोजी माझे खात्यात जमा झाल्याने आता लोकसेवक श्री.अरूण भाईदास चव्हाण, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांचेकडे माझे कोणतेच काम प्रलंबित नाही व ते आता माझेकडे लाचेच्या रक्कमेची मागणी करतील असे वाटत नाही.

तरी मी दिनांक 26/07/2019 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 30/07/2019 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईत, माझे जिल्हा परिषद ठाणे, बांधकाम विभागातील मुख्य इमारतीतील मुख्य लेखा वित्त अधिकारी व वि.अ.यांचे केबीनचे नुतणीकरणाचे केलेल्या कामाचे बिल मंजुर करून देणेकरीता लोकसेवक श्री.अरूण भाईदास चव्हाण, तत्कालीन कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे व श्री.सचिन बाळाराम चाळके, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांनी माझे कडे तडजोडी अंती 8,000/- रूपये लाचेची मागणी केली. म्हणून माझी त्यांचे विरोधात कायदेशीर फिर्याद असुन लोकसेवक श्री.अरूण भाईदास चव्हाण, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे व श्री.सचिन चाळके, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांचेविरूध्द कारवाई होणेस विनंती आहे.

माझी फिर्याद मराठीत संगणकावर टंकलीखीत करण्यात आली असुन ती बरोबर आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Ramrao Madhavrao Somvanshi(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

10/10/19

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Ramrao Madhavrao Somvansl

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(क्र.):

पोलीस ठाणे अंमलदार
लाचलुचपत पोलीस स्टेशन

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ठाणे नगर पोलीस स्टेशन ★ ठाणे शहर ★
सत्यमेव जयते



Scanned by CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**

Scanned by CamScanner